प्रकरण दुसरे

प्रा. केशव मेश्राम यांचा व्यक्ति व साहित्य परिचय

प्रकरण दुसरे

प्रा. केशव मेश्राम यांचा व्यक्ति व साहित्य परिचय

केशव मेश्राम- व्यक्ती परिचय

केशव मेश्राम हे मराठी साहित्यविश्वातले एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व. मेश्रामांच्या घरी कोणताही साहित्यिक वारसा नसताना त्यांनी विपुल लेखन केले. कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन, समीक्षा, संपादन इ. सर्वच क्षेत्रामध्ये त्यांनी मुक्तपणे संचार केला. या लेखनाच्या परिणामातूनच मेश्रामांचे व्यक्तिमत्त्व विकसीत होत गेले. मेश्रामांचे व्यक्तिमत्व विविधरंगी होते. व्यक्तिमत्त्वाच्या ह्या विविधांगी रंगांचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

केशव मेश्रामांचा जन्म २४ नोव्हेंबर १९३७ साली अकोला येथे झाला. पण ही जन्मतारीख शाळेत अंदाजे टाकण्यात आली होती. पण ह्याच दिवशी प्रत्येक वर्षी सर्वजण त्यांचा वाढदिवस साजरा करू लागले. तेंव्हा ती जन्मतारीख रूढ झाली. पूर्वी त्यांच्या वाडवडिलांचे संत्र्यांचे मळे होते. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. पण नंतर त्यांची परिस्थिती खालावत गेली. सर्व कुटुंब दारिद्र्याच्या खाईत गेले ते कायमचेच. मेश्रामांच्या आई वडीलांनी काबाड कष्ट करून त्यांचा सांभाळ केला. मेश्राम यांना शिक्षणाबाबत फार आस्था होती. स्वत: कष्ट करून त्यांनी शिक्षण घेतले. "इंटरच्या वर्गात जाईपर्यंत बरीच कामे केली. भुशाच्या कारखान्यात, तेल घाणीवर, खडीगोटे वाहणाऱ्या ट्रकवर, इमारतीच्या बांधकामाची, गोदामाच्या उंच लोखंडी तुळ्या व बॅक्रेटवर चुना कोळसा उपसण्याच्या रेल्वे वाघीणीवर, गवंड्यांच्या, सुताराच्या हाताखाली, पिठाच्या गिरणीवर प्रसंगी सायकल रिक्षा चालविली. अशा कामातून घर चालविले, शिक्षण घेतले."[१] शारिरिक कष्टाची अनेक कामं त्यांनी शिक्षणासाठी केली. पण त्यामध्ये खंड पडू दिला नाही. प्राथमिक शिक्षण त्यांनी अकोल्यात पूर्ण केले. हायस्कूलचे शिक्षण त्यांनी मुंबईतील कुर्ला हायस्कूलमध्ये घेतले. तेथे ते नववी पास

झाले. पण इंटरसाठी ते अकोल्याला गेले तिथे इंटर पास झाले. इंटर पास झाल्यानंतर ते मुंबईला आले ते कायमचेच.

केशव मेश्राम मुंबईतील सिद्धार्थ कॉलेजमध्ये जाऊ लागले. तिथे बी.ए. च्या वर्गात त्यांना वसंत सावंत, माधव अत्रे, सदानंद रोडे, वसंत हुबळीकर असे मित्र भेटले. या लेखक मित्रांच्या सानिध्यात त्यांचे व्यक्तिमत्व खुलत गेले. मुंबईत दादरच्या फुलबाजाराजवळ एक झोपडपट्टी होती. झोपडपट्टीच्या शेजारील एका चाळीत ते राहत होते. मेश्राम रल्वेत नोकरी करू लागले. रेल्वेत नोकरी करताना त्यांनी आपले शिक्षण अपूर्ण सोडले नाही. नोकरी करत करत ते बी. ए. झाले. विल्सन कॉलेजमध्ये रात्रीचे एम.ए चे वर्ग भरत होते. तिथे मेश्रामांनी एम.ए. च्या वर्गात प्रवेश घेतला. दिवसभर रेल्वेतील नोकरी करून मेश्राम रात्री विल्सन कॉलेजमध्ये येत असत. एम.ए. च्या वर्गात उषा व्होरा नावाची एक मुलगी होती. तिच्याशी मेश्रामांनी प्रेमविवाह केला. एम.ए. झाल्यानंतर त्यांनी रेल्वेतील नोकरी सोडली आणि महाडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १९६५पासून ते मुंबईतील परळच्या महर्षी दयानंद कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम करू लागले. या महाविद्यालयामध्ये त्यांनी सलग २१ वर्षे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. शेवटी मुंबई विद्यापीठात ते प्रपाठक आणि नंतर विभाग प्रमुख म्हणून काम करू लागले. चार वर्षे विभाग प्रमुखाचा पदभार सांभाळून ते १९९७ साली निवृत्त झाले.

केशव मेश्राम ह्यांना लहानपणापासूनच वाचनाची खूप आवड होती. ते अतिशय वाचनवेडे होते. मेश्राम यांचे शिक्षण अकोला आणि मुंबईतील कुर्ला येथे झाले. अकोल्यात असताना तेथील सार्वजनिक ग्रंथालयातील आणि मुंबईतील कुर्ल्याच्या स्वदेशी मिलजवळील वाचनालयातील असंख्य पुस्तके मेश्रामांनी वाचून काढली होती. खेळण्या-बागडण्याच्या वयात मेश्राम आपला जास्तीत जास्त वेळ पुस्तके वाचण्यात घालवत असत. मेश्रामांची वाचनाची आवड आहे याची अनेकांना माहिती होती.

सिद्धार्थ महाविद्यालयात असताना तेथील ग्रंथपाल शां. शं. रेगे ह्यांनीही त्यांची ही आवड जाणली होती. म्हणून रेगे मेश्रामांना हवी असलेली पुस्तके अगदी मागेल त्यावेळी देत. मेश्राम दादरच्या चाळीत राहत होते. "घरात शिरताच लक्षात येई ते पुस्तकांचं छोटं कपाट. खाकी कव्हरे घातलेली, स्पाईनवर लेखकाचं व पुस्तकाचं नाव काळ्या शाईत, टपोऱ्या अक्षरात लिहिलेली पुस्तकं बघितली की मेश्रामांच्या वाचनवेडाची जाणीव होई."[२] मेश्राम फक्त मराठी पुस्तकेच वाचत नव्हते तर हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकेही ते वाचत नव्हते तर हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकेही ते वाचत असत. या वाचनाच्या आवडीतूनच त्यांनी अनेक पुस्तके विकत घेतली होती. ह्या वाचनवेडातूनच पुढे ते एक नामवंत लेखक म्हणून उदयास आले.

केशव मेश्रामांनी आपल्या उभ्या आयुष्यात अनेकांना मार्गदर्शन केल्याचे दिसून येते. इतरांसाठी ते एक चांगले मार्गदर्शक होते. मेश्रामांनी कोणालाही कधी चुकीचे मार्गदर्शन केले नाही. कोणालाही कोणत्याही क्षणी मदत करण्याची त्यांची वृत्ती होती. केशव मेश्राम हे स्वत: पीएच.डी झाले नव्हते पण जवळजवळ साठ जणांना पीएच.डी. साठी त्यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शकाची चोख भूमिका बजावत त्यांनी अनेकांना संशोधनाच्या क्षेत्रात मदत केली. या त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे अनेकांनी साहित्य क्षेत्रात स्वत:चा नावलौकीक मिळवला. मेश्रामांचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी त्यांची ओळख असावी असे काही नव्हते. "कुणीही सरांच्या माहीमच्या गीतांजली नगरातील घरी जावे, अभ्यासासंदर्भात भरभरून मार्गदर्शन घेऊन यावे."[३] मेश्रामांना भेटण्यासाठी आगोदर त्यांची तारीख वगैरे घेणे अशी कोणतीही त्यांची अट नव्हती. मार्गदर्शनाची अपेक्षा करून येणाऱ्या प्रत्येकासाठी त्यांचे दरवाजे सदैव खुले असत. मेश्रामांनी कोणाचीही अपेक्षा भंग केली नाही. त्यांच्याकडे जे ज्ञान होते ते त्यांनी इतरांना भरभरून दिले. मेश्रामांबाबत डॉ. सुनील चंदनशिवे म्हणतात, "सरांनी अनेकांना मोठं केलं. अनेकांना अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. मग त्या शिक्षण क्षेत्रातील असतील

किंवा सामाजिक क्षेत्रातील असतील. सर आपल्या हातून जेवढे होईल तेवढे करत गेले. कधी त्यांनी कुणाला दुखवले नाही.''[४] मेश्रामांनी अनेकांना मार्गदर्शन केले पण कधीही त्यांनी त्याचा उल्लेख कोठे केला नाही. कारण मेश्राम हे निस्वार्थी मनाने इतरांना मदत करणारे होते.

केशव मेश्राम हे केवळ मार्गदर्शक नव्हते तर अडचणीच्या वेळी इतरांना आर्थिक मदतही करत होते. केवळ आश्वासनं त्यांनी कधी कोणाला दिली नाहीत. एकदा शब्द दिला की त्या शब्दाला ते जागणारे होते. काहींना अडचणीत पाहून त्यांनी स्वत:च्या मनाने आर्थिक मदत केली. डिंपल पब्लिकेशनचे अशोक मुळे यांना जागा घेण्यासाठी काही रक्कम कमी पडत होती. हे मेश्रामांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी मुळे यांना स्वत:च्या घरी बोलावले आणि म्हणाले, ''मी नंदाशी बोललोय. हे एक लाख रूपये घ्या. तुमचं काम झाल्यावर मला सवडीने द्या. घाई नाही.''[५] मुळेंनी त्यांच्याकडे पैशाची मागणी केली नव्हती. तरीही मेश्रामांनी त्यांनी अडचण ओळखून त्यांच्यासाठी मदतीचा हात पुढे केला. आजच्या युगात स्वत:च्या नात्यातील लोकं उपयोगाला पडत नाहीत. पण मेश्रामांनी सर्वांना आपले मानून त्यांना मदत केली. त्यातून त्यांच्या माणुसकीचे दर्शन घडते.

केशव मेश्रामांनी आपल्या आयुष्यात माणसं जोडण्याचे काम केले. मेश्रामांच्या मैत्रीपूर्ण स्वभावामुळे त्यांना अनेक मित्र होते. केशव मेश्रामांनी मुंबई-बरोबरच इतरही ठिकाणी मित्रांचा गोतावळा निर्माण केला होता. या गोतावळ्यामध्ये साहित्यिक, प्रकाशक, विद्यार्थी, सर्वसामान्य लोकं इत्यादी सर्व स्तरातील लोकांचा समावेश होता. मेश्रामांशी एकदा ओळख झाली की ते त्यांचेच होऊन बसत.

गंगाधर पानतावणे, मधुकर केचे, सदानंद रेगे, वामन, होवाळ, प्र.श्री. नेरूरकर, शिरीष पै, मंगेश पाडगांवकर, सदा कऱ्हाडे असे अनेक सहृद मित्र मुंबईत त्यांना भेटले. पण मेश्रामांनी त्यांचा स्नेह कायम राखला. आपल्या मित्रांच्या प्रेमापोटी

मेश्रामांनी सदा कऱ्हाडे, ना. धो. महानोर, दि. के. बेडेकर, दया पवार, शांता शेळके, पु. ल. देशपांडे, सुनिता देशपांडे, दादा गोरे, नारायण सुर्वे या मित्रांना आपली पुस्तके अर्पण केली. मेश्रामांच्या मित्र प्रेमाबाबत प्रा. वि. शं. चौगुले म्हणतात, "नवे मित्र जोडणे, जुने ऋणानुबंध कायम ठेवणे, तरूण मुलांना लेखनासाठी उत्तेजन देणे, त्यांच्या भल्यासाठी प्रयत्न करणे यात मेश्रामांची स्नेहशील वृत्ती दिसून येते."[६] मेश्राम सतत प्रवास करायचे. आपल्या मित्रांच्या नेहमी गाठीभेठी ते घेत असत. वरचेवर मित्रांच्या सुखदु:खाच्या नोंदी ते घेत असत. आपल्या संशोधक विद्यार्थ्यांशीही ते अगदी मित्राप्रमाणेच वागत असत. एक प्राध्यापक आणि विद्यार्थी असे अंतर त्यांनी कधीच ठेवले नाही. आपल्या विद्यार्थ्यांचा विकास व्हावा यासाठी ते सतत धडपडत असत. विद्यार्थ्यांना नेहमी ते लेखनासाठी प्रोत्साहन देत असत. नवनवीन विषयावर त्यांना लेखन करण्यास सांगत असत. विद्यार्थ्यांना एम.ए. च्या वर्गावर तास घ्यायला सांगणे, अभ्यासक्रमातील पाठ्यविषयावर लेख लिहिण्याची कामं ते सांगत. मेश्रामांच्या मैत्रीपूर्ण स्वभावामुळे त्यांचे मित्रही त्यांना विसरत नसत. अशोक मुळे यांनी दादर आणि वामन होवाळ यांनी विक्रोळी येथे मेश्रामांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा घेतल्या. तेंव्हा अनेक क्षेत्रातील मेश्रामांचे मित्र प्रचंड संख्येने हजर राहिले होते, हे केवळ त्यांच्या माणसं जोडण्याच्या, आपुलकीच्या, प्रेमळ स्वभावामुळे.

केशव मेश्राम यांना लहानपणापासन अनेक दु:खांना सामोरे जावे लागले. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. या परिस्थितीमध्ये त्यांनी शारिरिक कष्टाची अनेक लहानमोठी कामं केली. स्वत: कामं करून त्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं. ह्या दरम्यान त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अनेक वेळा दु:ख सहन करावे लागले. निमूटपणे त्यांनी ते सहन केले कारण दु:ख सहन करणे हा त्यांचा मूळचा स्वभाव होता. कितीही दु:ख झाले तरी ते त्यांची कधी वाच्यता करत नसत. लहानपणापासून सोसलेल्या दु:खाबाबत ते कधीच कोणाशी चर्चा करत नसत.

मेश्रामांना आपल्या दु:खाचे भांडवल करता आले असते. पण त्यांनी तसे कधीच केले नाही. आपल्या लेखनातूनदेखील त्यांनी कधी त्यांच्या दु:खाचा बाऊ केल्याचे दिसत नाही. बरेच लेखक आपले थोडेसे दु:ख रंगवून सांगण्याचा प्रयत्न करत असतात. पण असा प्रयत्न मेश्रामांनी केल्याचे कोठेच जाणवत नाही. वैयक्तिक जीवनात अनेक ताणतणावांना त्यांना सामोरे जावे लागले. पण त्यांच्या वागण्या-बोलण्यात लेखनात आक्रोश, अभिनिवेश, कडवटपणा कधीच व्यक्त झाला नाही.

मेश्रामांनी त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या काळातही आपले दु:ख, वेदना याची जाणीव होवू दिली नाही. मेश्रामांना यकृताचा कर्करोग झाला. डॉक्टरांनी मेश्रामांचे आयुष्य सहा महिने शिल्लक असल्याचे निदान केले. प्रथम त्यांना कावीळ झाली. तापाने तर मरेपर्यंत त्यांची पाठ सोडलीच नाही. मेश्रामांच्या शरीरातील रक्त वारंवार बदलावे लागत होते. प्रथम दोन महिन्यांनी आणि नंतर महिना, पंधरा दिवस, आठवडा, शेवटी चार दिवसांनी रक्त बदलण्यासाठी त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागत होते. मेश्राम एवढे आजारी पडले होते पण त्यांनी आपले आजारपण इतरांना कधी जाणवू दिले नाही. स्वत:च्या पत्नीला देखील कधी आपल्या दु:ख, वेदनेबाबत कळू दिले नाही. त्यांच्या पत्नीने एके दिवशी त्यांना विचारले, "मेश्राम घरात आपण दोघेच असतो मला दु:ख होईल म्हणून तुम्ही तुमचा असह्य आजार तसाच झेलू नका, मला सांगत जा. अलीकडे तुम्ही काहीच बोलत नाही. अबोल असता. यातून माणसे वेगळाच अर्थ काढतात."[७] मेश्राम आपल्या वेदनांबाबत बोलतील असे त्यांच्या पत्नीला वाटले. पण निमूटपणे शारिरीक त्रास सहन करणारे मेश्राम म्हणाले, "अगं मी माझी एनर्जी साठवून ठेवतो."[८] ह्या विधानावरून मेश्राम आपले दु:ख कोणाला समजू नये आणि त्यामुळे कोणाला दु:ख होऊ नये याची किती खबरदारी घेत होते ते दिसून येते. मेश्राम आजारी असताना त्यांना भेटण्यासाठी त्यांचे अनेक मित्र येत असत. पण आपण आजारी नसल्याचे ते त्यांना भासवत असत. त्यांच्याशी गप्पा मारत असत. स्वत:च्या दु:खाची जाणीव मित्रांना होऊ नये यासाठी ते धडपड करत असत.

केशव मेश्राम हे निमुटपणे दु:ख सहन करणारे तसेच स्वत:पेक्षा इतरांचा विचार करणारे होते. मेश्रामांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात इतरांच्या सुखदु:खाचाच विचार केला. मेश्रामांच्या रोगाचे निदान झाले. डॉक्टरांनी त्यांना दहा ते बारा तास विश्रांती घेण्याचा सल्ला दिला होता. पण ऐकतील ते मेश्राम कसले. कर्करोगाचे निदान झाले असताना, मृत्यू डोळ्यासमोर असताना मेश्रामांनी विश्रांती न घेता स्वत:ला लेखनात गुंतवून घेतले. कारण त्यांना अनेक दिवाळी अंकांसाठी लेख द्यायचे होते. मेश्रामांनी अनेकांना लेख देण्याबाबत शब्द दिला होता. त्या शब्दाला जागण्यासाठी त्यांनी स्वत:च्या आजारपणाकडे दुर्लक्ष केले. अनेक दिवाळी अंकांसाठी त्यांनी लेख तयार केले. तेंव्हा नंदा मेश्राम म्हणतात "सरांच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी कमी होऊ लागले होते. परंतु त्यांचे लिखाणाचे प्रमाण मात्र वाढतच राहिले."[९] मेश्रामांनी ह्या काळातील लेखन हे शरीर साथ देत नसतानादेखील पूर्ण केले. मेश्रामांनी 'अक्षरधर्म' हे पुस्तक आमदार दिलीप वळसे-पाटील यांना समर्पित केले होते. आणि त्यांच्याच हस्ते ते प्रकाशित करणार होते. पण शरीर साक्ष देत नाही हे समजल्यावर त्यांनी पुस्तकाचे प्रकाशन मंत्रालयात जाऊन करण्याचे ठरवले. भर पावसात मंत्रालयात गेले पण आमदारसाहेब निघून गेले होते. तेंव्हा मेश्रामांनी तेथेच घरगुती पद्धतीने त्या पुस्तकाचे प्रकाशन केले. यावरून एक गोष्ट जाणवते की मेश्रामांना त्यांच्या मृत्यूपूर्वी त्यांची अपूरी कामं इतरांना दिलेली आश्वासनं पूर्ण करायची होती आणि त्यांनी ती केली.

केशव मेश्राम हे एक चांगले व्याख्याते होते. व्याख्यानासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पालथा घातला होता. त्याबाबत नंदा मेश्राम म्हणतात, "व्याख्यान आणि भाषण देणे म्हणजे सरांचे दुसरे जगणे होते."[१०] कारण आपल्या जवळ जे जे काही ज्ञान आहे ते इतरांना भरभरून देण्याची त्यांची वृत्ती होती. मेश्राम आजारी असल्यामुळे त्यांना धड उभेही राहता येत नव्हते. रंगराव भोंगळे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई विद्यापीठामध्ये होते. कार्यक्रमाला जाण्याच्या परिस्थितीत नसतानादेखील मेश्राम तेथे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गेले आणि पंधरा मिनिटे त्यांनी भाषण केले. या प्रसंगावरून त्यांच्या व्याख्यान आणि भाषणांच्या आवडीचा प्रत्यय येतो. आजारी पणाच्या काळात ते घरात पडून होते पण त्यांचे मन मात्र व्याख्याने देण्यासाठी धाव घेत होते.

केशव मेश्राम यांना फक्त वाचन आणि लेखनाचा छंद नव्हता. तर त्यांना प्रेक्षणीय स्थळं पाहण्याचाही छंद होता. व्याख्याने, परिषदा, पुस्तक प्रकाशनांच्या निमित्ताने ते नेहमी विविध ठिकाणी जात असत. तेंव्हा ते त्या त्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी आपला काही वेळ घालवत असत.

केशव मेश्रामांनी आपल्या आयुष्यातील बराच वेळ लेखनात घालवला असला तरी त्यांनी आपल्या कुटुंबाकडे कधी दुर्लक्ष केले नाही. केशव मेश्रामांनी दोन लग्ने केली. दुसरे लग्न केल्यानंतर ते आपली पहिली पत्नी आणि मुलांपासून वेगळे राहू लागले. पण त्यांनी आपल्या मुलांना वडीलांचे प्रेम कमी केले नाही. मुलांपासून दूर राहूनदेखील त्यांचे योग्य रीतीने पालनपोषण केले. त्यांना कधी कोणत्या गोष्टीची कमतरता भासू दिली नाही. तसेच पहिली पत्नी साधना आणि मुलांनीही त्यांना कधी अंतर दिले नाही. वेगवेगळ्या ठिकाणी ते राहत असले तरी मनाने मात्र एकच होते. त्याचा प्रत्यय मेश्रामांच्या शेवटच्या काळात दिसून येतो. मेश्रामांच्या आजारपणात त्यांची मुले हर्षद, कुणाल, राहूल, सुना सीमा, उल्का, पहिली पत्नी साधना हे सर्वजण त्यांची ममतेनं देखभाल करत होते. अशा या सर्वगुणसंपन्न व्यक्तिची २९ नोव्हेंबर २००७ रोजी वयाच्या ७० व्या वर्षी मुंबई येथे प्राणज्योत मावळली.

केशव मेश्राम हे माणुसकीने वागणारे होते. मेश्रामांनी स्वत:पेक्षा माणसांचा विचार केला. या माणसांमध्ये सर्व स्तरातील, सर्व क्षेत्रातील माणसांचा समावेश होता. या आपल्या माणसांना कोणत्याही प्रकारचे दु:ख होऊ नये याची खबरदारी ते घेत होते. मेश्रामांनी कधीही, कोणालाही दुखवले नाही. स्वत:पेक्षा इतरांसाठी जगणे त्यांनी पसंत केले. मरेपर्यंत त्यांनी एक माणूस म्हणूनच जगण्याचा प्रयत्न केला. अशा या माणसाशी, माणसाप्रमाणे वागणाऱ्या मेश्रामांच्या साहित्याचा परिचय करून घेवू.

केशव मेश्राम यांना लहानपणापासूनच वाचनाची फार आवड होती. या वाचनातूनच त्यांचे विचार प्रगल्भ होत गेले. णेश्रामांना आपली परिस्थिती आणि भोवतालचा समाज ह्याचे भान होते. या जाणीवेतूनच त्यांनी लेखनास सुरूवात केली. आपल्या लेखनाबाबत ते एके ठिकाणी म्हणतात, "माझं लेखन समग्र आयुष्यात घडलेल्या अनेकांच्या सुखदु:खाचा, यशापयशांचा, तिरस्कारांचा, प्रीतीचा स्वतंत्र किरण आहे. त्यात मी थोडाफार उजळून निघतो. कधीकधी जळूनही जातो."[११] म्हणजे केशव मेश्रामांचं लेखन हे त्यांनी अनुभवलेल्या जीवनावर, अनेक लोकांच्या जीवन प्रसंगावर अवलंबून असल्याचे येथे जाणवते.

केशव मेश्राम हे स्वत: दलित होते पण त्यांनी आपल्या जातीचा बावटा कधी मिरवला नाही. मेश्रामांनी स्वत: दलित आहे म्हणून केवळ दलितांच्या जीवनावरच लेखन केले नाही. "सगळ्या माणसांना समतेनं जगता यावं, त्यांना विकासाची संधी मिळावी, गौतम बुद्धांचा 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा संदेश प्रत्यक्षात यावा हे त्यांच्या लिखाणाचं सूत्र होतं."[१२] या लेखनसूत्रानुसारच ते आयुष्यभर लेखन करत राहिले त्यामुळे केशव मेश्राम हे सवर्ण आणि दलितांना आपलेसे वाटतात. केवळ दलित मनाचा हुंकार हाच त्यांच्या चिंतनमननाचा गाभा नव्हता. जीवन जगत असताना त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे, समाजातील पिडीत लोकांचे दु:ख जाणून घेतले होते. मग तो कोणत्याही जातीतील, धर्मातील असो. मुंबईत राहत असताना त्यांना तेथील उबगवाण्या जीवनाचं, विषमतेचं, शोषणाचं, दर्शन घडले. त्यामुळे मेश्रामांनी कथा, कादंबरी, कविता इत्यादी वाङमय प्रकार हाताळताना कुङ्गल्याही विशिष्ट प्रणालीला- इजमला बांधून घेतले नाही. "दलित, ललित साहित्य असा कुङ्गलाही भेदभाव त्यांच्या लेखनात नव्हता. त्यांचे समग्र लिखाण हे माणसाचे, माणसासाङ्गी माणूस म्हणून लिहिलेले होते."[१३] मेश्रामांच्या लिखाणात कधीही आक्रोश, कडवटपणा, आक्रस्ताळेपणा व्हाक्त झाला नाही.

केशव मेश्रामांनी कथा, कादंबरी, निबंध समीक्षाग्रंथ लिहिले असले तरी त्यांचा मूळचा पिंड कवीचा होता. मेश्रामांनी आपल्या लेखनाची सुरूवात कवितेपासून केल्याचे दिसून येते. सिद्धार्थ कॉलेजमध्ये बी.ए. ला असताना मेश्राम 'शलाका' ह्या भित्तिपत्रिकेसाङ्गी कविता लिहित असत. येथूनच त्यांच्या काव्य लेखनाची सुरूवात झाली आणि त्यांनी एका महाकवीचे रूप धारण केले.

कवितासंग्रह :

उत्खनन – पॉप्युलर प्रकाशन, १९७७ (महाराष्ट्र शासनाचा कवी केशवसुत पुरस्कार)

१. जुगलबंदी – परिमल प्रकाशन, १९८२.

२. अकस्मात – सुरेश एजन्सी, पुणे, १९८२.

३. चरित–आंबेडकर प्रबोधिनी, मुबई, १९८९.

४. कृतकपुत्र – डिंपल प्रकाशन, वसई, २००१.

५. अनिवास – डिंपल प्रकाशन, वसई, २०००५.

६. दाम्पत्यगीता – (मूळ कन्नड काव्य सुमतींद्र नाडिंग), सांगती साहित्य अकादमी, बेळगाव, २००४

केशव मेश्राम यांनी आपल्या ह्या काव्यसंग्रहातून दलित, पिढीत, उपेक्षित समाजाचे दु:ख, वेदना मांडल्या आहेत. जीवन जगत असताना आलेले अनुभव ह्या कवितांतून व्यक्त झाले आहेत. "आपल्या सात पिढ्यांवर इथल्या सवर्णांनी केलेला अन्याय ते प्रखरपणे मांडतात पण तोच अन्याय, अत्याचार दलितांवर कशाप्रकारे चालतात, याचे अनेक संदर्भ त्यांच्या कवितेत आले आहेत. आपल्या समाजाची जाणीव, बेदरकार पण बेरकीवृत्ती आणि दलित समाजाची स्थिती बदलविण्याची धमक त्यांच्या कवितेत आहे. केशव मेश्रामांच्या कवितेत जुन्या संस्कृतीविषयी तिरस्कार दिसून येतो. तसेच नवीन विज्ञानमूलक संस्कृतीचा स्वीकार झाल्याचे दिसून येते. आंबेडकरी

विचारप्रणालीचा अंगीकार आहे. त्यांची कविता जुन्या विचारांना तिलांजली, संघर्षवाद पुकारते. मेश्रामांना आंबेडकरांविषयी अपार श्रद्धा, निष्ठा होती. आंबेडकरांनी दलित समाजासाठी अर्पण केलेल्या आयुष्यावर त्यांनी अनेक कविता लिहिल्या.

दलित जीवनाबरोबरच मुंबईतील फुटपाथवरील माणसे, झोपडपट्टीत किळसवाणे जीवन जगणारे, तसेच कष्टकरी गिरणी कामगारांबाबत त्यांची कविता हळहळते. मेश्रामांच्या कवितेत महानगरीय संवेदना, जातीसंघर्ष, वर्ण-संघर्ष, आत्मसंघर्ष, कौटुंबिक भावजीवनातील संघर्ष, आत्मलक्षी जाणीव, निसर्ग जाणीव इत्यादी आशयसूत्रे दिसून येतात.

कथाकार :

केशव मेश्राम यांनी सर्वात जास्त कोणता लेखनप्रकार हाताळला असेल तर तो म्हणजे कथा. कथा हा केशव मेश्रामांचा आवडता प्रांत. म्हणून मेश्रामांनी अनेक कथा लिहिल्याचे दिसून येते. मेश्रामांचे बरेच कथा संग्रह प्रकाशित झाले आहेत.

कथासंग्रह :

१) 'खरवड' - धारा प्रकाशन, औरंगाबाद, १९८०.

२) 'पत्रावळ' - दिनपुष्प प्रकाशन, मुंबई, १९८१.

(महाराष्ट्राचा विशेष पुरस्कार)

३) 'धगाडा' - श्रीविशाखा प्रकाशन, पुणे, १९८४.

महाराष्ट्र शासनाचा दिवाकर कृष्ण पुरस्कार,

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (कऱ्हाड) पारितोषिक

४) 'मरणकळा' - सुरेश एजन्सी, पुणे, १९८८.

५) 'आमनेसामने' - सुरेश एजन्सी, पुणे, १९८९.

६) 'ज्वालाकल्लोळ' - डिंपल प्रकाशन, वसई, १९९६.

७) 'खांडवन' - दिलीप प्रकाशन, मुंबई, १९९७.

८) 'धूळवावटळ' – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

९) 'कोळिष्टके' – साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

१०) 'चिखलचोथा' – प्रियदर्शी, प्रकाशन, कोल्हापूर, २००७.

११) बालवाङ्मय (कथा) – सातपुड्यातील खजिना, निर्मलप्रकाशन, पुणे, १९७८.

ह्या सर्व कथासंग्रहाच्या माध्यमातून केशव मेश्रामांनी विपूल कथालेखन केले. मेश्राम ह्यांनी आपले आयुष्य अकोला आणि मुंबई या ठिकाणी घालवले. या ठिकाणी त्यांच्या सानिध्यात अनेक व्यक्ती आल्या. या लोकांच्या जीवनावरच त्यांनी कथा लिहिल्या. मेश्रामांच्या कथा ह्या खेडेगावातील आणि मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या आहेत. मेश्राम यांच्या कथेतील पांढरपेशी समाजातील नाहीत. ती विविध प्रकारची कामे करून स्वत:चे पोट कसे भरता येईल याचा विचार करणारी आहेत. मेश्रामांनी विशिष्ट एकाच जातीच्या किंवा धर्माच्या लोकांच्या कथा लिहिल्या नाहीत. अनेक धर्माची आणि जातीची माणसे मेश्रामांच्या कथांमध्ये दिसतात. मेश्रामांच्या कथेतील माणसे जशी शोषित आहेत. तशीच ती अन्यायाने चिडणारी, धुमसणारी आणि अन्यायाविरूद्ध आपली जोरदार प्रक्रिया दर्शविणारी आहेत. मेश्रामांच्या कथेत स्त्रियाही आहेत. या स्त्रिया इतरांकडून फसवल्या गेलेल्या, वासनांध लोकांच्या अत्याचाराला अगतिकतेने बळी पडलेल्या आहेत. पण काही स्त्रिया ह्या फसवल्या जाऊनही पुन्हा कष्ट करून स्वत:च्या पायावर उभे राहणाऱ्या आहेत. "मेश्रामांच्या कथा नवकथेनंतरच्या काळातील आहेत. पण नवकथेतील सूक्ष्मता, संयम, नैतिक दृष्टिकोन, वास्तवचित्रण, विषयाचा वेगळेपणा ही सगळी वैशिष्ट्ये याही कथांत आहेत. नवकथांचे वैशिष्ट्य असणारे मनोविश्लेषणही काही सराईतपणे आले आहे."[१५] मेश्रामांच्या कथा या माणसाचे जीवन कशाप्रकारे आहे. हे जीवन ते कसे जगू पाहतात. ते जगताना त्यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते याचे चित्रण करतात.

कादंबरीकार :

केशव मेश्राम यांनी काव्य आणि कथेप्रमाणे कादंबरी लेखनही केले आहे. पण काव्य आणि कथेच्या मानाने त्याचे प्रमाण कमी आहे. मेश्रामांनी उभ्या आयुष्यात फक्त तीनच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पण त्या अतिशय विलक्षण अशा आहेत. कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे रूढ संकेत झुगारून देऊन आपल्या आत्मजाणिवेच्या व विलक्षण अनुभवविश्वाच्या आधारे अगदी वेगळ्या कादंबऱ्या मेश्रामांनी लिहिल्या आहेत.

कादंबरी :

१. 'हकिकत' आणि 'जटायू' – पी. सी. एच. बुक स्टॉल, मुंबई, १९७२.
(महाराष्ट्र शासनाचा ह. ना. आपटे पुरस्कार),
हायडेलबर्ग विद्यापीठ, जर्मनी येथे अनूवादून अभ्यासार्थ.

२. 'पोखरण' – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९,
(महाराष्ट्र शासनाचे विशेष पुरस्कार)

'हकिकत' चे वैशिष्ट्य म्हणजे ती आत्मकथनात्मक कादंबरी असूनही कुठेही 'पोज' घेणारी किंवा मुद्दाम स्वत:ची प्रतिमा निर्माण करण्यासाठी लिहिलेली नाही. 'हकिकत' मधील तो पुन्हा मुंबईत येऊन स्थिरावतो. पुर्वीच्या कुर्ल्याच्या शाळेतील जुन्या मित्रांना तो एका बागेत बोलावतो आणि आपला अकोल्यातील भूतकाळ त्यांना कथन करतो. असं 'हकिकत'चे स्वरूप आहे. मुंबईत तो येतो पण त्याला त्याच्या वस्तीतील माणसांच्या जीवनात काहीच बदल झाल्याचे जाणवत नाही. ती तशीच दारिद्र्यात खितपत पडलेली असतात, त्याची त्याला खंत वाटते.

'जटायू' मधील अभिमानला आपल्याच आईवडीलांच्या मागासलेपणाचा, अंधश्रद्धांचा मनोमन राग येतो. स्कॉलरशिपचे पैसे साठवून तो रिक्षा घेतो, रेल्वे पोलीसासाठी त्याची निवड होते. सोना पत्नी म्हणून त्याच्या मनाला फारसे समाधान देवू शकत नाही. वर्गातल्या एका मुलीचे त्याला आकर्षण वाटते. ती अप्रामाण्य आहे हे त्याला कळते. धार्मिकतेच्या नावाखाली एका स्त्रीवर अत्याचार होतो. त्याला तो साक्षीदार होतो. त्याच्या बहीणीला मुलगा होत नाही म्हणून तिच्या सासरचे लोक तीला

मारून टाकतात. पण तो काहीच करू शकत नाही. त्याची सगळी स्वप्नं उध्वस्त होतात. शेवटी अभिमानाची अवस्था जटायूसारखी विकल होते.

'पोखरण' मध्ये कोण होतो? सर्व दलितांना सतवणाऱ्या ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी ते खूप मागच्या काळापर्यंत गेले आहेत. आदिम जीवनाच्या स्थितीचे वास्तवचित्रण, हुबेहुब पद्धतीने त्यांनी 'पोखरण' मध्ये रेखाटले आहे. इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन देणारी अत्यंत परिणामकारक अशी वास्तव कादंबरी असेच 'पोखरण'चे वर्णन करावे लागेल. आर्यांची तथाकथित प्रगत संस्कृती भारतातील आदिम द्रविड संस्कृतीला, प्रस्तापित होण्यापूर्वीच वाळवीसारखे पोखरत जाते हेच मेश्रामांना 'पोखरण' मधून सांगायचे आहे.

ललित गद्य :

१. 'छायाबन' – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७३.

२. 'रूतलेली माणसे' – दिनपुष्प प्रकाशन, मुंबई, १९८२.

३. 'गाळ आणि आभाळ' – सुरेश एजन्सी, मुंबई, १९७९.

४. 'गळतीचे क्षण' – डिंपल प्रकाशन, वसई १९७७.

५. 'ओलाव्यातले ठसे' – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००४.

केशव मेश्राम यांच्या ललित लेखनाची सुरूवात 'साधना' साप्ताहिकातून झाली. कवी मंगेश पाडगावकरांच्या शिफारशीने मेश्रामांनी 'साधने'त लेखन केले. काहीशा रोमँटिक, चिंतनपर अशा स्फुट लेखांचा 'छायाबन' हा मेश्रामांचा पहिला संग्रह आहे. एक कवीप्रवृत्तीचा, निसर्गप्रेमी, हळवा, भावुक लेखक 'छायाबन' मध्ये प्रामुख्याने प्रकट झाला.

'रूतलेली माणसे' हा व्यक्तिचित्रणावर लेखसंग्रह आहे. लेखकाच्या नात्यातील आई-वडील, आजी-आजोबा, मामा अशी माणसे. तसेच चेटूक करणारी, परिसराने बहिष्कृत केलेली इलमा ही लेखकाबद्दल जिव्हाळा व माया असणारी म्हातारी, बाबाजी नावाचा मांत्रिक ह्या व्यक्तींवर मेश्रामांनी लेखन केले आहे. ही 'रूतलेली माणसे' आहेत.

'गाळ आणि आभाळ' व 'गळतीचे क्षण' ह्या दोन लेखसंग्रहातील लेखांमधील आशय, अभिव्यक्तिमध्ये साम्य आहे. या संग्रहात काही लहानसहान प्रसंगचित्रे आहेत. काही व्यक्तिदर्शने आहेत. ह्या लेखसंग्रहातील लेखातून वऱ्हाडातील अकोले आणि बडनेरा या गावातील तसेच मुंबईतील सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे तिथल्या माणसांच्या जीवनशैलीचे वर्णन केले आहे.

समीक्षक :

कवी, कथाकार, कादंबरीकार ह्याप्रमाणेच मेश्राम एक श्रेष्ठ समीक्षक होते. कथेच्या खालोखाल त्यांनी सर्वात जास्त लेखन समीक्षेच्या क्षेत्रात केल्याचे दिसून येते. मेश्रामांचे अनेक समीक्षा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

समीक्षा ग्रंथ :

१. 'समन्वय' – परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, १९७९.

२. 'प्रश्नशोध' – लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७९.

३. 'शब्दांगण' – दिनपुष्प प्रकाशन, मुंबई, १९८०.

४. 'बहुमुखी' – प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९८४.

५. 'शब्दबंध' – शारदा प्रकाशन, ठाणे १९८९.

६. 'अक्षरभाकिते – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९.

७. शब्दवृत' – लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २०००.

८. 'अन्वेषण' – प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

९. 'साहित्य-संस्कृती मंथन' – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००४.

१०. 'साहित्य-प्रवर्तन' – कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००५.

११. 'दलित साहित्य आणि समाज'– नवभारत प्रकाशन संस्था, २००५.

१२. 'प्रतिभा स्पंदने' – निर्मल प्रकाशन, नांदेड, २००६.

18366

संपादने :

१. 'विद्रोही कविता' – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८

(नागपूर, शिवाजी, सागर, विक्रम, होळकर आणि मुंबई विद्यापीठामध्ये बी. ए. (मराठी) विद्यार्थ्यांसाठी अनेक वर्षे क्रमिक पुस्तक म्हणून)

२. 'दलित साहित्याची स्थितीगती' – अनुभव प्रकाशन व मुंबई विद्यापीठ प्रकाशन, मुंबई, १९७९.

संशोधन :

१. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चिंतन', लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९२.

विशेष कार्य :

सदस्य : साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ,
कायदा व न्याय सल्ला मंडळ (अनेक वर्षे)

सदस्य : डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधन समिती, महाराष्ट्र शासन

विशेष संपादन : मुंबई साहित्य संघाच्या साहित्य अंकाचा अखिल भारतीय साहित्य संमेलन विशेषांक (१९८६)

अध्यापन अनुभव : ४० वर्षे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, महाड.
महर्षी दयानंद कॉलेज, परळ आणि मुंबई विद्यापीठ,
मराठी विभाग प्रमुख व प्रपाठक, निवृत्त – १९९७.

समन्वयक : दूर शिक्षण संस्था, मुंबई विद्यापीठ, एम. ए.
(मराठी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास पुस्तके तयार करवून घेणे आणि मार्गदर्शन करणे) (१९९६ पासून)
जनता शिक्षण प्रसारक मंडळ, अलिबाग, एम.ए. (मराठी) विद्यार्थ्यांसाठी अतिथी प्राध्यापक (१९९४ पासून)

खास सन्मान :

१. अध्यक्ष : अस्मितादर्श लेखक- वाचक मेळावा, मुंबई-१९७८

२. डॉ. भालचंद्र फडके: म.सा.प. पुणे, दलित समीक्षा पुरस्कार-२०००

३. अध्यक्ष : मुंबई उपनगर साहित्य संमेलन, विलेपार्ले, मुंबई-२००१

४. महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार दलित साहित्य योगदानासाठी-२००२

५. साहित्य अकादमी : शिलाँग, मेघालय कवितोत्सव निवड-२००३

६. शाहू : फुले परिवर्तन अकादमी, पुणे, लेखक सन्मान पुरस्कार-२००३

७. अध्यक्ष : अकरावे कामगार साहित्य संमेलन, पिंपरी-चिंचवड, पुणे-२००४

८. गोवा : स्वातंत्र्यदिन सर्वभाषिक कविसंमेलन, मराठी प्रतिनिधी, गोवा-२००४

९. अध्यक्ष : मराठी, कोकणी नवोदितांचे ९ वे साहित्य संमेलन, पुणे-२००४

१०. अध्यक्ष : मराठी पत्रलेखक संघ संमेलन, मुंबई-२००४

११. जीवनगौरव पुरस्कार, मराठी वृत्तपत्र लेखक व पत्रलेखक संघटना, मुंबई-२००५

१२. अध्यक्ष : ७८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नाशिक-२००५.

समारोप :

अशाप्रकारे केशव मेश्राम हे एक वाचन वेडे, मार्गदर्शक, हितचिंतक, अडचणीच्यावेळी धावून येणारे, माणसं जोडणारे, मैत्रीसाठी जागणारे, स्वतः दुःख सहन करून इतरांचे सुख चिंतणारे, माणुसकीने वागणारे व्यक्तिमत्त्व आहे. तसेच ते एक कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, म्हणूनही मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संदर्भ सूची

१. चंदनशिवे सुनिल : दलित साहित्यातील तेजस्वी तारा :केशव मेश्राम, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ५०

२. चौगुले वि. श. : दलित साहित्यातील तेजस्वी तारा : केशव मेश्राम, संपा. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ३७

३. चंदनशिवे सुनिल : तत्रैव, पृ. क्र. १२

४. चंदनशिवे सुनिल : तत्रैव पृ. क्र. १२

५. मुळे अशोक : दलित साहित्यातील तेजस्वी तारा : केशव मेश्राम, संपा. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ३५

६. चौगुले वि. शं. : तत्रैव, पृ. क्र. ४२

७. मेश्राम नंदा : तत्रैव, पृ. क्र. २४

८. मेश्राम नंदा : तत्रैव, पृ. क्र. २४

९. मेश्राम नंदा : तत्रैव, पृ. क्र. २१

१०. मेश्राम नंदा : तत्रैव, पृ. क्र.२३

११. चौगुले वि. शं. : दलित साहित्यातील तेजस्वी तारा : केशव मेश्राम, संपा. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ४१

१२. चौगुले वि. शं. : तत्रैव, पृ. क्र. ४१

१२. मेश्राम नंदा : तत्रैव, पृ. क्र. १९

१३. चंदनशिवे सुनिल : दलित साहित्यातील तेजस्वी तारा :केशव मेश्राम, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र. ११३

१४. मांजरेकर गीता : दलित साहित्यातील तेजस्वी तारा : केशव मेश्राम, संपा. सुनिल चंदनशिवे, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, २००८, पृ. क्र.